दिनांक : 10/03/2023

कार्यालयीन टिपणी सादर,

**विषय:** स्मार्ट पीआययुपीएमसी या कार्यालयातील कृषी तंत्र अधिकाऱ्यांचे वेतनातून कपात केलेला व्यवसाय कर व रिटर्नचा खर्च मेसर्स मिलिंद ढेबे अँड असोसिएट्स पुणे.सनदी लेखापाल यांचे देयक PFMSव्दारे अदा करणे बाबत.

**संदर्भ:** १.स्मार्ट/ पीसीएमयु/लेखा/निधीमर्यादा/३८९/२०२३ स्मार्ट कार्यालय, पुणे, दि. .०३/०३/२०२३.
२. वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. वि .अ . प्र – २०१३ / प्र. क्र – ३०/२०१३/ वि. नियम भाग २ दि . १७/०४/२०१५ .
३. मेसर्स मिलिंद ढेबे अँड असोसिएट्स, सनदी लेखापाल यांचे देयक क्र .

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिर्वतन (स्मार्ट) पीएमसी प्रकल्पातंर्गत श्रीमती सुवर्णा विजय आदक, कृषी तंत्र अधिकारी यांची प्रतिनियुक्तीने स्मार्ट पीआयू पीएमसी मध्ये बदली झाली आहे. दि. २२ जुलै,२०२२ रोजी त्यांनी पदभार स्वीकारला. त्यांचे वेतन दि. २२ जुलै, २०२२ ते ३१ डिसेंबर, २०२२ रोजी पर्यंतचे अदा करण्यात आले आहे. परंतु त्या वेतनामधील कपात केलेला व्यवसाय कर अद्याप भरलेला नाही.

सदर व्यवसाय कर भरण्याबाबत PCMU स्मार्ट यांचेकडून आलेल्या सूचनेनुसार सदर व्यवसाय कर नंबर हा नवीन न काढता, तो पुणे महानगरपालिकेच्या व्यवसाय कर नंबर वर भरण्यात यावा असे सांगण्यात आले होते. परंतु, पुणे महानगरपालिकेच्या मुख्य वित्त लेखा विभागाशी चर्चा केली असता असे निदर्शनास आले की,त्याच्या पी.टी. नंबर वर व्यवसाय कर जमा केला तर त्यांच्या लेखापरीक्षणाला समस्या येऊ शकते असे सांगण्यात आले. त्यामुळे स्मार्ट प्रकल्पातील सनदीलेखापाल यांनी अंतर्गत लेखापरीक्षणावेळी नवीन नंबर काढण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार नवीन पी.टी. नंबर काढण्यात आला आहे. त्याच्या सुचनेनुसार नवीन नंबर काढून माहे ऑगस्ट,२०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीचा चलन व रिटर्न भरण्यात आले आहे. या सर्व प्रक्रीयेमुळे सदर चलन व रिटर्न भरण्यास विलंब झाल्यामुळे विलंब शुल्क आकारला गेला आहे. हा विलंब शुल्क प्रती माह रु.१०००/- इतका आहे .त्या प्रमाणे माहे ऑगस्ट, २०२२ ते डिसेंबर, २०२३ चा विलंब शुल्क हा रु. ५००० व माहे जानेवारीचे रु. २०० असे एकूण र.५२०० विलंब शुल्क इतका झाला आहेतरी सदर कर व विलंब शुल्काची रक्कम मेसर्स मिलिंद ढेबे या सनदी लेखापाल यांनी अदा केली आहे. संदर्भ क्र २ नुसार नियम क्र .२ व ७ नुसार मेसर्स मिलिंद ढेबे अँड असोसिएट्स,पुणे. सनदी लेखापाल यांचे देयक PFMS व्दारे अदा करण्यासाठी दि.०९/०३/२०२३ रोजीचे देयके त्यांचेकडून कार्यालयास प्राप्त झालेली आहेत . याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

Scanned with CamScanner

१. तिमाही TDS and GST TDS returns भरण्याचा खर्च .
२. माहे ऑगस्ट , २०२३ ते माहे जानेवारी,२०२३ या महिन्यातील कृषी तंत्र अधिकारी यांच्या वेतनातील कपात केलेला Professional Tax.
३. माहे ऑगस्ट, २०२२ ते जानेवारी ,२०२३ या कालावधीमधील विलंब शुल्क भरण्याचा खर्च .
४. माहे ऑगस्ट, २०२२ ते फेब्रुवारी ,२०२३ Monthly Professional Taxreturns भरण्याचा खर्च.

| Sr. No. | Invoice No. | Date | Party Name | Description of Bill | Amount Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 263/2022-23 | 09/03/2023 | M/S MILIND DHEBE & ASSOCIATES, CA. | i) TDS Return Filing Q3 FY 2022 -23 Rs. 1500/-<br>ii) GST Return Filing Q3 FY 2022 -23. Rs. 1500/- | 3000 |
| 2 | 264/2022-23 | 09/03/2023 | M/S MILIND DHEBE & ASSOCIATES , CA. | i) PT Tax paid Aug to Jan 2023<br>ii) Late fee Aug 2022 to Dec 2022 and Jan 2023.<br>iii) Filing of PT Return From Aug 2022 to Feb 2023 | 1200<br>5200<br>2800 |
| | | | | **Total Amount Rs.** | **12200** |

सदरची रक्कम रु.12200/- मेसर्स मिलिंद ढेबे अँड असोसिएट्स,पुणे. सनदी लेखापाल यांना अदा करण्यास मंजुरीमिळावी. अवलोकन मान्यता तथा अदायगी आदेश स्वाक्षरीस्तव सादर.

(मंजुश्री गायकवाड)
लेखापाल,
स्मार्ट पीआययु पीमसी.

(सुवर्णा आदक)
कृषी तंत्र अधिकारी,
स्मार्ट पीआययु पीमसी.

(संगीता कोकाटे)
अधीक्षक,
(अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग)
पुणे महानगरपालिका .

माधव जगताप
उप आयुक्त
(अतिक्रमण/अनाधिकृत
बांधकाम निर्मुलनविभाग) ) तथा
नोडल अधिकारी,
प्रकल्प अंमलबजवणी कक्ष (स्मार्ट )
पुणे महानगरपालिका .

Scanned with CamScanner